कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/बाचिस्प/२०२५–२६/१९२७
दि. १९/०२/२०२६

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून शनिवार दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धा केवळ गोव्यातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येत आहे. दोन विभागातून ही स्पर्धा घेण्यात येणार असून इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी व आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी अशी विभागवार वर्गवारी करण्यात आली आहे.

दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी सदर स्पर्धा कला अकादमीच्या आवारात सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. या स्पर्धेचा विषय "गोव्याची संस्कृती" (Goan Culture) असा असून स्पर्धकांनी केवळ जलरंग (Water Color) वापरुन चित्र तयार करावे.

निर्धारित नमुन्यातील अर्ज कला अकादमीच्या कार्यालयात तसेच कला अकादमीच्या **www.kalaacademygoa.co.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. विहित नमुन्यातील भरलेल्या प्रवेशिका कला अकादमीच्या कार्यालयात दि. २६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत स्वीकारले जातील.

कला अकादमी गोवा तर्फे सर्व शाळांना व विद्यार्थ्यांना या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्याचे आवाहन, तसेच आयत्या वेळी स्पर्धास्थानी येणा–या प्रवेशिका अथवा स्पर्धकाना प्रवेश दिला जाणार नाही याची सर्व संबंधितानी कृपया नोंद घ्यावी असे कळविण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)